# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १७/०६/२०१५**

आज बुधवार दि. १७/०६/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०६/०६/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गि ता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ६) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ७) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ८) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ९) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ११) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १२) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १३) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १७) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १८) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १९) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २०) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २१) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २२) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २३) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २५) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| २६) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| २७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २८) | शरद केशव पाटील | सदस्य |
| २९) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३०) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३१) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३२) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३३) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ३५) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३६) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ३७) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ३८) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ३९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४०) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४१) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ४३) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४४) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४५) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ४६) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ४७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ४८) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ४९) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५०) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५१) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५२) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ५३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५४) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ५५) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ५६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ५७) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ५८) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ५९) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ६०) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ६१) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ६३) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| २) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| ४) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ५) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| ६) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ८) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ९) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| १०) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ११) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| १२) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| १३) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १५) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| १६) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| १७) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| १८) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| १९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| २०) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| २१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| २२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| २३) | भोईर भावना राजू | सदस्या |
| २४) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| २५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| २६) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| २७) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| २८) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| २९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ३०) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ३१) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ३२) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ३३) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

**निरकं**

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. १७/०६/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. ०६/०६/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये ग्रामपंचायत, नगरपरिषद, महापालिका आजपर्यंत जे सभागृह होते ते अत्यंत गुण्यागोविंदाने सर्व धर्म समभावाने चालत आली. ह्या सभागृहातील माजी सदस्या माजी महापौर श्रीम. मायरा मेन्डोंसा ह्यांचे दुःखद निधन झाले. दुःखद निधनामध्ये सर्व सभागृह सहभागी आहे. तसेच संपुर्ण मिरा भाईंदर शहर मिरा भाईंदर मधील सर्व नागरीक सर्व धर्मांचे, पंथांचे लोक, सर्व राजकीय पक्षाचे नेते कार्यकर्ते हे मेन्डोंसा कुटुंबाच्या दुःखात सहभागी झाले. आज ही सभा होते वेळी ह्या सभागृहाला अती दुःख होत आहे. श्रीम. मायरा मेन्डोंसा ज्यावेळी महापौर झाल्या आम्ही ह्या सभागृहातील जूनी लोक आहोत अनेक वर्ष सभागृहात काम केले. ज्या दिवशी त्यांचे महापौर साठी नाव आले शहरात अशी चर्चा होती की नगराध्यक्षाची पत्नी आणि ते खरे होते त्या गृहीणी होत्या त्यांचा राजकारणाशी काही संबंध नव्हता. त्यांचे पती राजकारण करत होते हे जरी खरे असले तरी त्यांच्यावर त्यांच्या पक्षाने दिलेली जबाबदारी महापौर म्हणून त्या ज्या दिवशी खुर्चित बसल्या त्या दिवसापासुन त्यांचा कार्यकाल संपेपर्यंत श्रीम. मायरा मेन्डोंन्सा ह्यांनी ह्या सभागृहातील सर्व पक्षाच्या सदस्यांना, अधिकाऱ्यांना हे सभागृह चालवते वेळी बाहेर काय चर्चा होईल त्याची चिंता करुन त्याची दखल घेऊन हे सभागृह गुण्यागोविंदाने चालवायचा प्रयत्न केला मी भारतीय जनता पार्टी त्यावेळी विरोधी पक्षनेता म्हणून भुमिका बजावत होतो. आम्ही विरोधी पक्षनेता म्हणून बाजू मांडत होतो. पूर्ण वेळ त्या संधी देत होत्या. बोलायला मौका देत होत्या. महापौर म्हणुन त्याचा आपलेपणा किती असायचा त्या सांगायच्या किंवा फोन करायच्या की काका पुरे झाले आता पुढे बोलु नका त्यांनी जो जिव्हाळा ठेवला होता सर्व पक्षाच्या नगर सेवकांबरोबर सामान्य महिला असुन सुध्दा अत्यंत सदविवेक प्रामाणिकपणे त्यांनी अडीच वर्षे कार्यकाल चालवला त्यांना जमेल तेवढे त्यांनी काम केले आणि सभागृहाने त्यांना साथ दिली. आज त्या सभागृहात नाही आहेत. आपले आजचे कामकाज चालते वेळी मी सभेचा ठराव मांडतो त्यानंतर सभागृहात असलेल्या सर्व पक्षाच्या नेत्यांनी, सदस्यांनी आपआपल्या परीने त्याना श्रध्दांजली वाहायची आहे. मी ठराव मांडतो आहे. आज दि. १७/०६/२०१५ रोजी मा. महासभा हि आपल्या मिरा भाईंदर शहराच्या माजी महापौर श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांचे दि. १४/०६/२०१५ रोजी दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे. श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा या शहराच्या महापौर असताना सर्वांना एकत्रित घेऊन समन्म विचाराने त्यांनी त्यांचा कार्यकाल व्यतित केलेला आहे. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर आलेल्या संकटास ध्येर्याने सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना द्यावी अशी ईश्वर चरणी प्रार्थना करण्यात येत आहे व श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांना भारतीय जनता पक्ष, शिवसेना, बहुजन विकास आघाडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस पक्ष व हे सभागृह भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करीत आहे आणि आजची सभा रद्द करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबरे इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम महापौर स्वर्गीय मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा ह्यांचे आजारामुळे दुःखद निधन दि. १४/०६/२०१५ रोजी झाले. शहराच्या रहिवाश्यांच्या तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन २००२ साली नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले आणि ऑगस्ट २००२ ला महानगरपालिकेचे प्रथम इलेक्शन झाले. आणि प्रथम श्रीम. मायरा मेन्डोंसा ह्यांना उमेदवारी देण्यात आली त्या नगरसेविका म्हणुन निवडुन आल्या. त्यानंतर राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीची सत्ता आली आणि त्यांना पहिल्यांदाच महापौर पदाचा मान भेटला आणि या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर म्हणुन निवडुन आल्या. काही अनुभव नसताना एक घरातील गृहीणी नगरसेविका झाली आणि लगेच महापौर झाल्या त्यांनी कधीही सभा बघीतली नाही. अशा परिस्थितीत अडीच वर्षांचा कालावधी अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडला आम्हाला असे वाटले होते ते पार पाडु शकणार नाहीत पंरतु त्यांनी चांगल्या पध्दतीने पार पाडला असे श्री. रोहिदास पाटील यांनी सांगितले. सत्ता राष्ट्रवादी कॉंग्रेसची असताना देखील त्यांनी विरोधकांना बोलायला चान्स दिला. विरोधकांना मत मांडायचा चान्स दिला. विरोधकांची कामे त्यांनी प्राधान्याने केली. कधीही कोणाचा आवाज दाबला नाही. मनसोक्तपणे त्यांना जे मत मांडायचा होत त्याचे जे विचार होते चांगले सजेशन होते त्याने ते अमलात आणले. माझे असे मत आहे की सत्ताधाऱ्यांपेक्षा विरोधकांना प्रथम प्राधान्य दिले.

काकांशी तसेच बाकी सदस्यांशी चांगले संबंध ठेवले. त्यांच्या नावातच मायरा म्हणजे माय जसे आपण आई म्हणतो तसे त्यांच्या नावातच आईपण आहे त्यांनी प्रत्येकाला आईचे प्रेम दिले, प्रत्येकाला बहिणीचे प्रेम दिले, प्रत्येकाला मुलाचे प्रेम दिले अशी चांगली बाई आपल्यातून निघून गेली ज्यावेळी त्या महापौर होत्या तेव्हा मी सभागृह नेता होतो. आम्ही मिटींगला बरोबर जात तेव्हाचा एक किस्सा सांगतो. जात असताना आमच्यापूढे एक सायकलवाला जात होता आणि एका बाईकवाल्याने त्या सायकलवाल्याला धडक दिली आणि तो बाईकवाला सरळ पळून गेला. मॅडमनी इमेजिएटली गाडी पुढे जाऊन थांबवली त्यांची विचारपूस केली. त्यांना पाणी पाजले आणि त्यांना हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले ती मिटींग त्यांनी पोसपॉन केली आणि हे काम केले. म्हणजे सभागृहाच्या बाहेर देखील मिरा भाईंदरच्या जनतेसाठी त्यांनी प्रेम दिले अशी व्यक्ती आपल्यातून निघून गेली ईश्वर त्यांच्या मृतात्म्यास शांती देवो त्यांच्या कुटुंबियांना ह्या दुःखातून सावरण्यासाठी शक्ती देवो अशी मी श्रध्दांजली वाहतो. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो सभा रद्द करणे अशी कायद्यात कुठेही तरतूद नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, असे आहे की आम्ही जर ठरवले तर आपण ही सभा रद्द करु आणि पून्हा नविन विषय घेऊ. कारण त्यांचे दिवसकार्य अजून बाकी आहे. ७ ते ८ मेंबर त्याच्या कुटुंबातले आहेत. त्यांचे दिवसकार्य आहेत काकांनी जशी सुचना मांडली त्या सुचनेला आम्ही समर्थन करतो.

**निलम ढवण :-**

माजी महापौर आणि आपल्या महानगरपालिकेतील सदस्या ज्या महिलेने ह्या महानगरपालिकेमध्ये प्रथम महापौर पदाची धूरा सांभाळली अशा सन्मा. मायराजी मेन्डोंसा ह्या आपल्यामध्ये नाहीत त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मी शिवसेनेतर्फे मनपूर्वक आदरांजली वाहते आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख पचवण्याची शक्ती परमेश्वर देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करते. धन्यवाद.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रथम माजी महापौर श्रीम. मायरा गिल्बर्ट मेन्डोंसा ह्यांचे रविवार दि. १४ जून २०१५ रोजी दुपारी १.३० च्या सुमारास दुःखद निधन झाले. मा. मायरा मेन्डोंसा ह्या सन २००२ साली मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत भरघोस मताने प्रथमच निवडून आल्यानंतर त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम महापौर बनण्याचा मान मिळाला. आपल्या प्रेमळ व मायाळू स्वभावाने त्यांनी सर्व जात, पात, धर्म, संप्रदाय व सर्व राजकीय पक्ष विरोधकांची मने जिंकून मा. महापौरांची व सभागृह पिठासीन अधिकारी म्हणून अत्यंत सक्षमपणे जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली आहे. मा. मायरा मेंन्डोंसा यांच्या दुःखद निधनामुळे मायेचे छत्र हरपले म्हणून एक प्रेमळ व मायाळू सर्वांना बरोबर घेऊन काम करणाऱ्या सच्च्या नेत्यांना परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**ठराव क्र. ०४ :-**

आज दि. १७/०६/२०१५ रोजी मा. महासभा हि आपल्या मिरा भाईंदर शहराच्या माजी महापौर श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांचे दि. १४/०६/२०१५ रोजी दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे.

श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा या शहराच्या महापौर असताना सर्वांना एकत्रित घेऊन समन्म विचाराने त्यांनी त्यांचा कार्यकाल व्यतित केलेला आहे. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर आलेल्या संकटास ध्येर्याने सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना द्यावी अशी ईश्वर चरणी प्रार्थना करण्यात येत आहे व श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा यांना भारतीय जनता पक्ष, शिवसेना, बहुजन विकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्ष व हे सभागृह भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करीत आहे आणि आजची सभा रद्द करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा संपण्याची वेळ सकाळी ११.५० वाजता)**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका